# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. १६७ दिनांक २२/०६/२०२१

## घरफोडी करणा-या ३ आरोपीतांना काशिमिरा पोलीसांनी केली २४ तासांचे आत अटक

.............................................................................................................................................

दिनांक १६/०६/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. ते रात्रौ २०.०० वा. चे दरम्यान नकुल बिल्डींग रुम नं.१०३, पांडव इन्क्लेव्ह हटकेश, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे येथे फिर्यादी सौ. रिना सिराज मंडल, वय ३२ वर्ष, यांचे राहते घराचे कोणीतरी अज्ञात चोरट्याने लोखंडी दरवाज्याचा कडी कोयंडा कशानेतरी तोडुन त्यावाटे आत प्रवेश करुन बेडमधील बॅगमध्ये ठेवलेले १) ०८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन २) ०५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी ३) ०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे ०२ कानातील, ४) २०००/- रोख रक्कम असा एकुण ७४,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल चोरुन घेउन गेलेबाबत फिर्यादी यांनी दिनांक २०/०६/२०२१ रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमीरा पोलीस ठाणे गु.रजि.नं. ४४८/२०२१ भादवि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर काशिमीरा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळास भेट देवून तांत्रिक माहिती मिळवुन त्या आधारे आरोपी १) मनोज ऊर्फ मन्या सुरेंद्र शर्मा, वय २८ वर्ष, २) मुस्ताक निजामउददीन इद्रीसी, वय ३४ वर्षे, दोन्ही रा. धानीवबाग, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर व ३) साहील झाकीर हुसेन, वय २० वर्ष, रा. बटरपाडा, पेल्हार, ता. वसई जि. पालघर यांचा नालासोपारा परीसरात शोध घेवुन नमुद आरोपीतांना २४ तासांच्या आत अटक केली. नमुद अटक आरोपी क्र १ याचेविरुध्द यापुर्वी मिरा भाईंदर आयुक्तालयाचे हददीत ४६, मुंबई शहर आयुक्तालयाचे हददीत ४५ व ठाणे शहर आयुक्तालयाचे हददीत ४० असे एकुण १३१ पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहे.

सदरची कामगिरी श्री. विलास सानप, सहा. पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संजय हजारे, वरीष्ठ पोलीस निरिक्षक काशिमीरा पोस्टे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. महेंद्र भामरे, सपोनि. प्रशांत गांगुर्डे, पोना. जरग, शिंदे, पोशि. सुर्यवंशी, यादव, बडे, राठोड, नागरे, खोत, तायडे, माहिले, नलावडे, मोरे, तेरवे यांनी केली आहे.

-----------oooooooo-----------